मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांच्या आस्थापनेवरील अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांक: अस्थायी ०२१९/प्र.क्र.५८/कार्यासन-११
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १९ सप्टेंबर, २०१९.

<u>पहा:</u> १. शासन निर्णय वित्त विभाग क्र.असंक १००१/प्र.क्र.२९/२००१,वित्तीय सुधारणा,दि.१०.९.२००१.

२. शासन निर्णय क्र.अस्थायी ०२१९/प्र.क्र.५८/कार्यासन ११,दि.०६.०३.२०१९.

३. शासन निर्णय वित्त विभाग क्र.पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क.दि.११.०९.२०१९.

४. मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांचे पत्र No.५०७०/२०१९, दि.१८.०९.२०१९.

शासन निर्णय :

मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांच्या आस्थापनेवरील ३७४ अस्थायी पदांना संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये दि. ०१.०३.२०१९ ते दि.३०.०९.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

२. मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांनी संदर्भ क्र. ४ च्या पत्रान्वये विनंती केल्यानुसार त्यांच्या आस्थापनेवरील पुढील तक्यात नमूद केलेली ३७४ अस्थायी पदे दि.०१.१०.२०१९ ते दि. २९.०२.२०२० पर्यंतच्या कालावधीत पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	पदांची संख्या
१	सहायक प्रंबधक	०२
२	सहायक अधीक्षक	०७
३	मुख्य लिपीक	०१
४	न्याय लिपीक	३६
५	दुभाषी	३६
६	स्वीय सहायक	०८
७	लघुलेखक (उ.श्रे.)	३०
८	लघुलेखक (नि.श्रे.)	१०
९	मुख्य रोखपाल	०३
१०	वरिष्ठ लिपीक	०३
११	मुख्य टंकलेखक	०१
१२	सहायक रोखपाल	१०
१३	लिपिक	०१
१४	टंकलेखक	३९
१५	लिपिक टंकलेखक	७३
१६	वाहन चालक	१२
१७	नाईक	०२
१८	शिपाई	५९

१९	हमाल	१४
२०	चपराशी	१०
२१	स्वच्छक	०२
२२	मेहतर	०१
२३	उद्ववाहक	०१
२४	शिपाई (कंत्राटी पध्दतीने)	०३
२५	हमाल (कंत्राटी पध्दतीने)	०४
२६	चपराशी (कंत्राटी पध्दतीने)	०३
२७	सफाईगार (कंत्राटी पध्दतीने)	०३
	एकूण पदे	३७४

३. यासाठी होणारा खर्च मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई या कार्यालयासाठी मागणी क्र.जे-१,२०१४,न्यायदान,(०००)१०७ इलाखा शहर दंडाधिकारी न्यायालये, (००),(००)(०१) इलाखा शहर दंडाधिकारी न्यायालये (अनिवार्य)(२०१४ ०२३४) ०१- वेतन या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षात मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क.,दि.११.०९.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharastra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१९१८३३०४५९१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Santosh Sampatti Navagire

Digitally signed by Santosh Sampatti Navagire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=214b4345a2842afe7dd0cbda9e8d83579cbedaaaef30f215ceda096e4e407797, serialNumber=0cb1b0de020015cf6d1f800579271f4816460b1802c2ae247dd6dd6f47462cd3, cn=Santosh Sampatti Navagire
Date: 2019.09.19 18:38:25 +05'30'

(सं.सं.नवगिरे)
कार्यासन अधिकारी

प्रत:-

१) महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.
२) मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई.
४) महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७) वित्त विभाग, व्यय-५ / आ.पु.क.कक्ष /अर्थसंकल्प ११,मंत्रालय, मुंबई.
८) विधि व न्याय विभाग, कार्या-२०/कार्या-२३,मंत्रालय, मुंबई.
९) निवडनस्ती (कार्यासन ११)